महाराष्ट्र शासन

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र.तंशिप्र-१२२४/प्र.क्र.१०/सीईटी/२०२४/४२८ दिनांक - १८/०३/२०२४.

# जाहिर सूचना

## एमएएच- बी. बी.सी.ए./बी.बी.ए./ बी.एम.एस./ बी.बी.एम.-सीईटी-२०२४

## MAH-B. BCA/BBA/BMS/BBM-CET 2024

संदर्भ - तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीस/बीबीए बीसीए सीईटी अभ्यासक्रम/२०१४/११६, दिनांक ०४ मार्च, २०२४.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रसिध्द केलेल्या ॲप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक प्रमाणे बी. बी.सी.ए./बी.बी.ए./बी.एम.एस./बी.बी.एम. अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारीत आणलेला आहे. तसेच सदरील अभ्यासक्रमाला व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली आहे.

सदर बी. बी.सी.ए./बी.बी.ए./ बी.एम.एस./ बी.बी.एम. अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून सामाईक प्रवेश परीक्षा **(MAH-B. BCA/BBA/BMS/BBM-CET-2024)** घेण्यात येणार असून प्रवेश परीक्षेच्या निकालाच्या आधारे प्रवेश होणार आहेत. परिणामी बी. बी.सी.ए./बी.बी.ए./ बी.एम.एस./ बी.बी.एम. या अभ्यासक्रमास प्रवेश घेवू ईच्छीणाऱ्या उमेदवारांना या कार्यालयातर्फे घेण्यात येणारी समाईक प्रवेश परीक्षा अनिवार्य आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तसेच सदरील परीक्षेचे वेळापत्रक व इतर माहितीसाठी उमेदवारांनी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या संकेतस्थळावर www.mahacet.org भेट द्यावी.

सही/-

आयुक्त

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,

महाराष्ट्र राज्य, मुंबई